UPA NATIONAL E-JOURNAL
Interdisciplinary Peer-Reviewed Indexed Journal
Special Issue : Volume-10 : Issue-1 (January-2024)
ISSN 2455-4375

# नविन शैक्षणिक धोरण २०२० आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमातील बदल

**मुग्धा मनिष राजनकर**
संशोधक
रा. तु. म. ना. विद्यापीठ, नागपूर
मो. नं. ९४२३६८८८४८
Email Id - mugdharajankar@gmail.com

**डॉ. शालिनी फुलमाळी**
मार्गदर्शक
भालेराव विज्ञान महाविद्यालय सावनेर, जि. नागपूर
मो. नं.९४२२३०७११०
Email Id-drshalinifulmali958@gmail.com

---

***सारांश :***

*जुन्या बाबीमध्ये बदल घडवून नविन बाबींचा स्विकार करणे आणि त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे हेच खरे विकासाचे ध्येय. कारण कोणत्याही बाबतीत बदलत्या परीप्रेक्षानुसार बदल होणे आवश्यक आहे. आज ग्रंथालय हे पुस्तकापुरते मर्यादित राहिलेले नाही. त्यामुळे ग्रंथालयात माहिती तंत्रज्ञानाचा शिरकाव, वाचकांचा ई – स्त्रोतांकडे वाढता कल लक्षात घेता नविन शैक्षणिक धोरणातंर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाच्या पदवी ते आचार्य पदवी पर्यंत सर्वत्र बदल करण्यात आले आहेत. त्याच अनुषंगाने प्रस्तुत संशोधन लेख सादर करीत आहे.*

**कि वर्ड :** नविन शैक्षणिक धोरण २०२०, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र

---

**प्रस्तावना :**

भारतात शैक्षणिक क्षेत्रात नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू झालेले आहे किंवा लागू होणार आहे, हा आज सर्वत्र एक चर्चेचा विषय झालेला आहे. नविन शैक्षणिक धोरण २०२० यात काय आहे कि ज्यामुळे शैक्षणिक क्षेत्रात बदल घडून येणार आहेत, प्रत्यक्षात अंमलबजावणी कधी पासून सुरु होणार, असे अनेक प्रश्न सर्वांसमोर उभे आहेत. नविन शैक्षणिक धोरण २०२० अतंर्गत वर्ग पहिली ते आचार्य पदवी स्तरापर्यंत सर्वच शैक्षणिक स्तरावरील अभ्यासक्रमात असा बदल घडवून आणलेला आहे कि यात सर्वांना आपल्या आवडीचा विषय निवडण्याची मुभा राहणार आहे, त्याचप्रमाणे भाषेची मर्यादा दूर करण्यात आलेली आहे. बहुशाखीय अभ्यासक्रमाला प्राधान्य देण्यात आले आहे. असे जरी असले तरी या नियमावलीची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विद्यापीठ अनुदान आयोगांतर्गत प्रत्येक विद्यापीठाला दिली आहे. प्रत्येक विद्यापीठाकडे त्यांच्या अभ्यासक्रमात बदल करण्याचे हक्क दिले आहे. या बदलांचा विचार करता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या विद्यापीठातील आतंरविद्याशाखेय विभागातील एक महत्वाचा विषय म्हणजे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र होय. या विषयाला देखील नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू झालेले आहे व त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी ग्रंथालय आणि माहितीशास्त्र (सी. बी. सी. एस.) दोन वर्षीय पदव्यूत्तर स्तरावर २०२३ – २०२४ या वर्षापासून सुरु करण्यात आली आहे तर पदवी स्तरावरील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयावरील एक वर्षीय (सी. बी. सी. एस.) पदवी अभ्यासक्रमाकरीता २०२४ – २०२५ या वर्षापासून लागू करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे पदवी स्तरावरील इतर शैक्षणिक शाखा जसे कला, वाणिज्य, विज्ञान अश्या पारंपारीक अभ्यासक्रमात देखील एक निवडक विषय म्हणून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयाचा समावेश करण्यात आलेला आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये

आंतरविद्याशाखीय दोन वर्षीय ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पदव्युत्तर अभ्यासक्रमावर चर्चा करण्यात आली आहे.

**तक्ता क्रं. १ - अ : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र दोन वर्षीय (सी.बी.सी.एस.) पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाचे स्वरुप**

| अनु. क्रं. | सेमीस्टरचे प्रारुप | NEP 2020 लागू होण्यापूर्वी अभ्यासक्रम (2022 - 2023) | | | NEP 2020 लागू झाल्यावर अभ्यासक्रम (2023 - 2024) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य पेपर | निवडक पेपर (कोणताही एक ) | प्रात्यक्षिक पेपर | अनिवार्य पेपर | निवडक पेपर (कोणताही एक ) | प्रात्यक्षिक पेपर |
| १ | सेमीस्टर एक | FOLIS, KO, ISS | -- | Classification, Cataloguing,IT Basics, Inf. Sources | FOLIS, KO, RM | ISS, / ERM,/ MOOC | Classification, Cataloguing, Inf. Sources |
| २ | सेमीस्टर दोन | MLIC, ICT in LIC, RM | -- | Classification, Cataloguing,IT Basics, Inf. Sources | MLIC, ICT in LIC | IC, / IARC,/ MOOC | Classification, Cataloguing, IT, Internship, Lib. Visit |
| ३ | सेमीस्टर तीन | IC, ISRBC, ICT in LIC, SS, | AGR., / Legal,/ Ind. Inf. System,/ MOOC | IT, Internship, Lib. Visit, Seminar | ISRBC, ML | AGR., / Legal,/ Ind. Inf. System,/ MOOC | IT, **RP**, SS |
| ४ | सेमीस्टर चार | SAB,IARC, ML, IPR | ARCH.,/ BIS,/ Engee.,/ MOOC | IT Application (II), PWR | SAB, **ETLIC**, IPR | ARCH.,/ BIS,/ Engee.,/ MOOC | RP |

(नोट : १. वरील तक्त्यामध्ये प्रस्तुत केलेली माहिती रा. तु. म. ना. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध सिलॅबस मधून घेण्यात आलेली आहे. २. वरिल तक्त्यात वापरण्यात आलेल्या लघू शब्दांचे पुर्ण नाव पुढील प्रमाणे आहेत.
१. FOLIS–Foundation of Library and Information Science, 2. KO – Knowledge Organisation, 3. ISS – Information Source and Services, 4. MLISC – Management of Library and Information Center 5. ICT in LIC – Information and Communication Technology in Library and Information Centre, 6.RM – Research Methodology, 7.IC – Information and Communication, 8.ISRBC – Information Storage, Retrieval and Bibliographical Control, 9.SS – Soft Skill, 10.SAB – System analysis and Bibliometrics, 11.ML – Modern Libraries, 12. IPR – Intellectual Property Rights, 13. AGR – Agricultural / Ind – Industrial Information System, 14.ARCH – Architecture / BIS – Biotechnology / Engee – Engineering Information System, 15.PWR –

Project Work Report, 16.ETLIC – Emerging Trends in Library and Information Centre, 17. IARC – Information analysis, Repackaging and Consolidation, 18. RP – Research Project)

वरील तक्त्यावरुन असे लक्षात येते कि –

**तक्ता क्रं. १ – ब : नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र दोन वर्षीय (सी.बी.सी.एस.) पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमातील पेपरचे स्वरुप**

| अनु. क्रं. | सेमिस्टर | NEP 2020 लागू होण्यापूर्वी अभ्यासक्रम (२०२२ - २३) | NEP 2020 लागू झाल्यावर अभ्यासक्रम (२०२३ - २४) |
|---|---|---|---|
| १ | सेमीस्टर एक | १. लेखी पेपर तीन<br>२. प्रात्यक्षिक पेपर चार | १. लेखीपेपरचार<br>२. प्रात्यक्षिक पेपर तीन |
| २ | सेमीस्टर दोन | १. लेखी पेपर तीन<br>२. प्रात्यक्षिक पेपर चार | १. लेखी पेपर तीन<br>२. प्रात्यक्षिक पेपर पाच |
| ३ | सेमीस्टर तीन | १. लेखी पेपर पाच<br>२. प्रात्यक्षिक पेपर चार | १. लेखी पेपर तीन<br>२. प्रात्यक्षिक पेपर तीन |
| ४ | सेमीस्टर चार | १. लेखी पेपर पाच<br>२. प्रात्यक्षिक पेपर दोन | १. लेखी पेपर चार<br>२. प्रात्यक्षिक पेपर १ |
| | एकुण | • लेखी पेपर = १६<br>• प्रात्यक्षिक पेपर = १४ | • लेखी पेपर = १४<br>• प्रात्यक्षिक पेपर = १२ |

वरील तक्ता क्रं. १ – अ आणि ब या दोन तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते -

- एकुण चारही सेमीस्टर मिळून २०२२ – २३ सत्रात १६ लेखी पेपर होते, तर २०२३ – २४ या सत्रात १४ लेखी पेपर आहे. यावरुन असे लक्षात येते कि दोन लेखी पेपरचा भार कमी झालेला आहे.
- एकुण चारही सेमीस्टर मिळून २०२२ – २३ सत्रात १४ प्रात्यक्षिक पेपर होते, तर २०२३ – २४ या वर्षात १२ प्रात्यक्षिक पेपर आहे. यावरुन असे लक्षात येते कि दोन प्रात्यक्षिक पेपरचा भार कमी झालेला आहे.
- २०२२ – २३ या सत्रात फ़क्त सेमीस्टर तीन व चार या दोनच सत्रात विद्यार्थ्यांकिरिता निवडक पेपरचा समावेश होता तर २०२३ – २४ या सत्रात चारही सेमीस्टर मध्ये निवडक पेपरचा समावेश केलेला आहे. यामुळे विद्यार्थ्यांना प्रत्येक सत्रात एक आवडीचा विषय निवडणे सहज शक्य झाले आहे.

**तक्ता क्रं. २ - अ : २०२२ – २३ या सत्रात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र दोन वर्षीय (सी.बी.सी.एस.) पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाच्या परिक्षेचे स्वरुप**

| अनु. क्रं. | सेमीस्टरचे प्रारुप | एकुण पेपर | | | विद्यापीठाकडून दिले जाणारे एकुण मार्क | | महाविद्यालयाकडून अतंर्गत दिले जाणारे एकुण मार्क | | लेखी परिक्षेचे एकुण मार्क | प्रात्यक्षिक परिक्षेचे एकुण मार्क | एकुण मार्क | पास होण्याकरिता आवश्यक एकुणमार्कांची अट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य पेपर | निवडक पेपर | प्रात्यक्षित पेपर | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक परिक्षा | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक परिक्षा | | | | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक परिक्षा |
| १ | सेमीस्टर एक | ०३ | -- | ०४ | २४० | ३२० | ६० | ८० | ३०० | ४०० | ७०० | ४०% | ४०% |
| २ | सेमीस्टर दोन | ०३ | -- | ०४ | २४० | ३२० | ६० | ८० | ३०० | ४०० | ७०० | ४०% | ४०% |
| ३ | सेमीस्टर तीन | ०४ | ०३ पैकी ०१ | ०४ | ४०० | २३० | १०० | २० | ५०० | २५० | ७५० | ४०% | ४०% |
| ४ | सेमीस्टर चार | ०४ | ०३ पैकी ०१ | ०२ | ४०० | २३० | १०० | ७० | ५०० | ३०० | ८०० | ४०% | ४०% |
| | | १४ | ०२ | १४ | १२८० | ११०० | ३२० | २५० | १६०० | १३५० | | | |
| | | | | | २३८० | | ५७० | | | | २९५० | | |

**तक्ता क्रं. २ – ब : २०२३ – २४ या सत्रात नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र दोन वर्षीय (सी.बी.सी.एस.) पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमाच्या परिक्षेचे स्वरुप**

| अनु. क्रं. | सेमीस्टरचे प्रारुप | एकुण पेपर | | | विद्यापीठाकडून दिले जाणारे एकुण मार्क | | महाविद्यालयाकडून अतंर्गत दिले जाणारे एकुण मार्क | | लेखी परिक्षेचे एकुण मार्क | प्रात्यक्षिक परिक्षेचे एकुण मार्क | एकुण मार्क | पास होण्याकरिता आवश्यक मार्कांची अट | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनिवार्य पेपर | निवडक पेपर | प्रात्यक्षिक पेपर | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक परिक्षा | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक परिक्षा | | | | लेखी परिक्षा | प्रात्यक्षिक परिक्षा |
| १ | सेमीस्टर एक | ०३ | ०३ पैकी ०१ | ०३ | ३२० | १५० | ८० | -- | ४०० | १५० | ५५० | २०० | ७५ |
| २ | सेमीस्टर दोन | ०२ | ०३ पैकी ०१ | ०५ | २४० | २३० | ६० | २० | ३०० | २५० | ५५० | १५० | १२५ |
| ३ | सेमीस्टर तीन | ०२ | ०३ पैकी ०१ | ०३ | २४० | १२५ | ६० | १२५ | ३०० | २५० | ५५० | १५० | १२५ |
| ४ | सेमीस्टर चार | ०३ | ०३ पैकी ०१ | ०१ | ३२० | १०० | ८० | ५० | ४०० | १५० | ५५० | २०० | ७५ |
| | | | | | ११२० | ६०५ | २८० | १९५ | १४०० | ८०० | | | |
| | | एकुण | | | १७२५ | | ४७५ | | | | २२०० | | |

(नोट : १. वरील तक्त्यामध्ये प्रस्तुत केलेली माहिती रा. तु. म. ना. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध सिलॅबस मधून विश्लेषीत केलेली आहे.)

वरील तक्ता क्रं. २ – अ आणि ब या दोन तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते -

1. २०२२– २३ या सत्रात एकुण २९५० गुणांवर आधारीत लेखी व प्रात्यक्षिक परिक्षा घेतली जायची ती २०२३ – २४ या कलावधीतीत २२०० गुणांवर करण्यात आली. यावरुन असे लक्षात येते कि एकुण गुणांची संख्या नविन शैक्षणिक धोरण २०२० यात कमी करण्यात आलीआहे.
2. २०२२ – २३ या कालावधीत विद्यापीठाकडे एकुण गुण २३८० व महाविद्यालयाकडे अतंर्गत गुण ५७० पैकी देण्याची सोय होती ती २०२३ – २४ या कालावधीत विद्यापीठाकडे एकूण गुण १७२५ व महाविद्यालयाकडे अतंर्गत गुण ४७५ पैकी देण्याची सोय करण्यात आली. यावरुन असे निरिक्षणास येते कि, विद्यापीठ आणि महाविद्यालयीन असे दोन्ही स्तरावरील मार्कांची संख्या कमी करण्यात आली आहे.
3. २०२२ – २३ या कालावधीत पास होण्याकरिता विद्यार्थ्यांकरिता कमीत कमी ४०% टक्के अशी अट घालण्यात आली होती. परंतू २०२३ – २४ या कालावधीत नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू झाल्याने पास होण्याकरिता ५०% टक्क्यांची अट घालण्यात आली आहे. याचाच अर्थ प्रत्येक सेमीस्टरला जेवढे

विषय दिलेले आहे त्या प्रत्येकी सर्व विषयामध्ये ५०% टक्के मिळविणे आनिवार्य आहे.

अश्याप्रकारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्र दोन वर्षीय पदव्यूत्तर स्तरावरिल अभ्यासक्रमावर नविन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये परिक्षा घेण्याची व गुणांची आखणी करण्यात आली आहे.

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमाचा विचार केल्यास पारंपारिक अभ्यासक्रमातील लेखी आणि प्रात्यक्षिक विषयाचा समावेश तसाच ठेवला असून त्यात माहिती तंत्रज्ञान विषयक नवनविन संकल्पनांचा समावेश माहिती तंत्रज्ञानाशी संबंधीत लेखी आणि प्रात्यक्षिक पेपर मध्ये केलेला आहे. नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू झाल्यावर दोन वर्षीय पदव्यूत्तर अभ्यासक्रमात जरी दोन लेखी आणि प्रात्यक्षिक पेपरची संख्या कमी झालेली असली तरी कमी झालेल्या अभ्यासक्रमाचा भाग उपस्थित विषयामध्ये व्यवस्थित सामावून घेतलेला आहे आणि नवनविन आधूनिक संकल्पनांचा चौथ्या सेमीस्टरच्या **Emerging Trends in Library and Information Centre** या लेखी पेपर अंतर्गत आधुनिक ज्ञानाची जोड साधली आहे.

अश्याप्रकारे ग्रंथालय आणि माहितीशास्त्राच्या दोन वर्षीय पदव्यूत्तर अभ्यासक्रमात पारंपारिक विषयासोबतच आधूनिक तसेच प्रात्यक्षिक विषयाचां समावेश करण्यात आल्याने ग्रंथालयाचे पारंपारिक स्वरुप समजून घेण्यासोबतच त्यात नवनविन आधुनिक तंत्रज्ञानाची जोड लाभल्याने ग्रंथालयाचे झालेले आधुनिक स्वरुप जसे ई – ग्रंथालय, डिजीटल ग्रंथालय, आभासी ग्रंथालय या नवनविन संकल्पना समजून घेण्यास या अभ्यासक्रमात वाव मिळणार आहे. त्याचप्रमाणे यात इंटर्नशिप दोन महीने करणे अनिवार्य केल्याने विद्यार्थ्यांना शिक्षण घेता घेता प्रत्यक्ष कामाचा अनुभव यावा, ग्रंथालयातील प्रत्येक विभागातील काम समजून घेता यावे याकरिता मदत होणार आहे.

**नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील आचार्य पदवी प्रवेशचे स्वरुप :**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अतंर्गत २०२३ पासून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य नोंदणी करिता ब-याच अटी लागू केल्या आहे. जसे आचार्य पदवी करीता नोंदणी करण्याआधी प्रथम प्री – पीचडी कोर्सवर्क करणे अनिवार्य केले आहे. या कोर्स मध्ये संशोधन पध्दतीचे आणि लेखन कार्याचे शास्त्रीय ज्ञान मिळावे आणि संशोधकांमध्ये संशोधन प्रक्रियेचे बीज रोवावे हा त्यामागचा मुख्य उद्देश आहे. आचार्य नोंदणी करिता संशोधकाला राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अतंर्गत पेट परिक्षा किंवा महाराष्ट्र स्तरावरिल सेट किंवा राष्ट्रिय्र स्तरावरिल नेट परिक्षा उत्तीर्ण असणे अनिवार्य आहे. त्याचप्रमाणे १२ क्रेडीट प्री – पीचडी कोर्सवर्क (६ + ४ + २ = १२) पुर्ण करणे गरजेचे आहे. या अटी पुर्ण केलेल्या व्यक्तीलाच आचार्य नोंदणी करीता अर्ज करता येतो. २०२३ साली निर्देशन नंबर ३४ अतंर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर अतंर्गत प्री – पीचडी कोर्सवर्क ६ क्रेडीट करीता तीन विषय सुचविले आहे, ज्यांचे प्रमाणप्रत्र मिळविणे अनिवार्य आहे अन्यथा आचर्य नोंदणी करीता विद्यार्थी पात्र ठरणार नाही. यामध्ये Research Methodology, 3 Credit (Dr. Soumitro Banerjee), Introduction to Research, 2 Credit (Dr. Pratap Haridosa) and Effective Writing, 1 Credit (Dr. Binod Mishra). हे तिन्ही कोर्स विद्यार्थी ऑनलाईन पध्दतीने स्वयंम पोर्टल वरुन करु शकतात किंवा विद्यापीठातर्गत वस्तूनिष्ठ स्वरुपात ऑनलाईन परिक्षा आयोजीत करतात त्या अतंर्गत देखील करु शकतात. अश्याप्रकारचे नियोजन विद्यापीठातर्गत करण्यात आले आहे. या अटी पुर्ण झाल्यास आचार्य नोंदणी करिता अर्ज दाखल करु शकतात अश्या प्रकारची रुपरेषा २०२३ पासून लागू करण्यात आली आहे.

तसेच आचार्य नोंदणी करीता पुर्ण वेळ अथवा अर्धवेळ या दोन पर्यायापैकी एकाची निवड करुन नोंदणी करु शकतो. अर्धवेळ पर्याय निवडतांना जे नोकरीवर कार्यरत आहे अश्या संशोधकांकरिता कार्यरत असलेल्या कार्यालयातून प्रमुख पदाधिकार व्यक्तीकडून मिळालेले नो ऑब्जेक्शन सर्टीफ़िकेट जोडणे अनिवार्य असते.

नविन शैक्षणिक धोरण २०२० यात अध्यापन आणि संशोधन कार्यावर जास्त भर दिलेला आहे. याच अनुषंगाने सध्यस्थितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातंर्गत आंतरविद्याशाखेय ग्रंथाल्य आणि माहितीशास्त्र विषयात आचर्य पदवी अंतर्गत जे संशोधन कार्य झालेले आहे त्यासंदर्भात इथे थोडक्यात आढावा देत आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाची स्थापना १९२३ साली झाली. या विद्यापीठात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग २० ऑगस्ट १९५६ साली सुरु करण्यात आला. सुरवातीला डिप्लोमा कोर्स सुरु करण्यात आला. काही वर्षानंतर या कोर्सचे रुपांतर एक वर्षीय बी. एल. आय. एस. पदवी अभासक्रमात करण्यात आले. १९८४ साली एक वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. विद्यापीठ अनुदान आयोगातंर्गत २००३ पासून दोन वर्षीय पदव्युत्तर अभ्यासक्रम एम. एल. आय. एस. सी. सुरु करण्यात आला. १९८७ साली ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. सर्वप्रथम डॉ. पी. एस. जी. कुमार यांच्या मार्गदर्शानाखाली “Impact of Ranganathan on AACR – 2” या विषयात डॉ. राज्यलक्ष्मी यांना १९९२ साली आचार्य पदवी बहाल करण्यात आली. अश्याप्रकारे हळूहळू ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी बहाल होण्याचे प्रमाण वाढत गेले. २०१९ पर्यंत १९० संशोधकांनी आचार्य पदवी प्राप्त केली आहे.

**तक्ता क्रं. १ : कालक्रमानुसार संशोधन उत्पादकता दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रं. | वर्ष | कालक्रमानुसार संशोधन उत्पादकता | वारंवारिता | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | १९९२ – १९९६ | ०३ | - | १.५७% |
| २ | १९९७ – २००१ | ०५ | ०८ | २.६३% |
| ३ | २००२ – २००६ | १४ | २२ | ७.३६% |
| ४ | २००७ – २०११ | २५ | ४७ | १३.१५% |
| ५ | २०१२ – २०१६ | ७० | ११७ | ३६.८४% |
| ६ | २०१७ - २०१९ | ७३ | १९० | ३८.४२% |
| | एकुण | १९० | | १००% |

वरिल तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते -

1. वर्ष १९९२ ते २०१९ या २८ वर्ष कालावधीत एकुण १९० संशोधन कार्य झालेले आहे.
2. वर्ष १९९२ ते २०१९ या कालावधीत संशोधन कार्याचे प्रमाण वर्षनिहाय वाढत गेलेले आहे.
3. वर्ष २०१७ ते २०१९ या कालावधीत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात सर्वात अधिक ७३ (३८.४२%) संशोधन झालेले आहे.

**तक्ता क्रं. २ : शोधप्रबंधाचे भाषेनिहाय माहिती दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रं. | शोधप्रबंधाची भाषा | शोधप्रबंध संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २३ | १२.१०% |
| २ | इंग्रजी | १६६ | ८७.३६% |
| ३ | हिंदी | ०१ | ०.५२% |
| | एकुण | १९० | १००% |

वरिल तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते,

1. रा. तु. म. नागपूर विद्यापीठातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात सर्वाधिक १६६ (८७.३६%) संशोधन कार्य इंग्रजी भाषेत झालेले आहे.

**तक्ता क्रं. ३ : संशोधन कार्यात मार्गदर्शकांचे योगदान दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रं. | मार्गदर्शकांचे नाव | संख्या | अनु. क्रं. | मार्गदर्शकांचे नाव | संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पी. एस. जी कुमार | २५ | १९ | एस. एन शिन्नरकर | ४ |
| २ | मंगला हिरवाडे | १६ | २० | अनिल हिरवाडे | २ |
| ३ | सत्यप्रकाश निकोसे | १५ | २१ | व्हि. पी. भरांबे | २ |
| ४ | दत्रातय आर. देशपांडे | १४ | २२ | वैशाली चौखंडे | २ |
| ५ | डी. राज्यलश्मी | ११ | २३ | रमाकांत एम. देशपांडे | २ |
| ६ | शालिनी लिहितकर | १० | २४ | गौतम ताकसांडे | २ |
| ७ | अश्विनी पी. पराडकर | ९ | २५ | एम. नटराजन | २ |
| ८ | सुनिल एच. उरकुडकर | ९ | २६ | दिपक कापडे | २ |
| ९ | उमाजी पी. नाहले | ७ | २७ | सुधिर आस्तुंडकर | २ |
| १० | प्रमोद डाखोळे | ७ | २८ | पराग पराडकर | १ |
| ११ | प्रतिभा जी. ताकसांडे | ६ | २९ | एस. एम. रोकडे | १ |
| १२ | किशोर बी. काळे | ५ | ३० | सुनिल पुनवटकर | १ |
| १३ | सुरेश एच. गवळी | ५ | ३१ | रामदास लिहितकर | १ |
| १४ | वीना प्रकाशे | ५ | ३२ | धनंजय गभने | १ |
| १५ | प्रिंस अजयकुमार आगाशे | ४ | ३३ | वाय. एम. पाटील | १ |
| १६ | कृष्णकुमार ओ. मांडगावकर | ४ | ३४ | देवेंद्र भोंगाडे | १ |
| १७ | शालिनी फुलमाळी | ४ | ३५ | अनिल चिकाटे | १ |
| १८ | प्रकाश जैन | ४ | ३६ | अपर्णा एस. चौधरी | १ |
| | एकुण | | | | १९० |

वरिल तक्त्यावरुन असे निरिक्षणास येते,

१.	रा. तु. म. नागपूर विद्यापीठातील ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील संशोधन कार्यात डॉ. पी. एस. जी कुमार यांचे योगदान सर्वाधिक २५ आहे.

**तक्ता क्रं. ४: मार्गदर्शकांचे लिंगनिहाय संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रं. | मार्गदर्शकांचे लिंगनिहाय वर्गीकरण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरुष मार्गदर्शक | २६ | ७२.२२% |
| २ | महिला मार्गदर्शक | १० | २७.७७% |
| | एकुण | ३६ | १००% |

वरिल तक्त्या वरुन असे निरिक्षणास येते –

१.	१९९२ ते २०१९ या कालावधीत एकुण ३६ मार्गदर्शकांचे योगदान लाभालेले आहे.

२.	पुरुष मार्गदर्शकांचे प्रमाण महिला मार्गदर्शकांपेक्षा सर्वाधिक २६ (७२.२२%) आहे.

**तक्ता क्रं. ५ : संशोधकांचे लिंगनिहाय संख्यात्मक माहिती दर्शविणारा तक्ता**

| अनु. क्रं. | संशोधकांचे लिंगनिहाय वर्गीकरण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | पुरुष संशोधक | १२२ | ६४.२१% |
| २ | महिला संशोधक | ६७ | ३५.२६% |
| ३ | पुरुष / महिला उल्लेख नसलेले | ०१ | ०.५२% |
| | एकुण | १९० | १००% |

वरिल तक्त्या वरुन असे निरिक्षणास येते –

१.	१९९२ ते २०१९ या कालावधीत एकुण १९० संशोधकांचा सहभाग लाभालेले आहे.

२.	पुरुष संशोधकांचे प्रमाण महिला संशोधकांपेक्षा सर्वाधिक १२२ (६४.२१%) आहे.

**निष्कर्ष** :

थोडक्यात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर येथील आंतरविद्याशाखेय ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रमात दोन वर्षीय पदव्यूत्तर अभ्यासक्रम आणि आचार्य नोंदणी करिता नविन शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले आहे. अभ्यासक्रमात समाविष्ट विविध पारंपारिक ज्ञानाला अवगत करणे जसे आजही आवश्यक आहे त्याचप्रमाणे त्याच ज्ञानात नवनविन भर पडणे गरजेचे झाले आहे त्यामुळेच या अभ्यासक्रमात पारंपारिक सोबतच माहिती तंत्रज्ञाची जोड साधली आहे.

प्रस्तुत लेखात संशोधन कार्याचा थोडक्यात आढावा घेतला असता असा निर्ष्कष निघतो , रा. तु. म. नागपूर विद्यापीठात वर्ष १९८७ पासून ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयात आचार्य पदवी उपक्रम सुरु झाला. १९९२ मध्ये सर्वप्रथम डॉ. पी. एस. जी. कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. राज्यलक्ष्मी यांना आचार्य पदवी बहाल करण्यात

आली. त्यानतंर या विषयात संशोधन कार्य वाढत गेल्याने संशोधन उत्पादकतेमध्ये सतत वाढ होत गेली. १९९२ ते २०१९ या कालावधीत एकुण ३६ मार्गदर्शकांनी एकुण १९० संशोधकांना संशोधन कार्यात आपले योगदान दिलेले आहे. सर्वात अधिक योगदान डॉ. पी. एस. जी. कुमार यांचे आहे. सर्वात अधिक संशोधन कार्य इंग्रजी भाषेमधून झालेले आहे. संशोधन कार्यात पुरुष मार्गदर्शकांचे आणि पुरुष संशोधकांचे प्रमाण सर्वाधीक आहे.

**सुचना व शिफ़ारशी :**

1. नविन शैक्षणिक धोरण २०२० नुसार अभ्यासक्रमाची अमंलबजावणी ज्या ज्या महाविद्यालयातून केली जाणार आहे तिथे प्रशिक्षित व्यक्तीची नेमणूक करण्यात यावी.
2. दोन वर्षीय पदव्यूत्तर अभ्यासक्रमात समाविष्ठ विषयानुसार प्रशिक्षित व्यक्तिची नेमणूक करण्यात यावी.
3. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना, त्यांच्या पदानुसार कामाचा योग्य मोबदला पगाराद्वारे दिला जावा.
4. ग्रंथालय आणि माहितीशास्त्र अभ्यासक्रम अनुदानीत तत्वावर राबविला जावा.
5. अनिवार्य विषयासोबतच निवडीच्या विषयामध्ये विद्यार्थ्यांचा विचार केला जावा.
6. त्याचप्रमाणे निवडक पेपर मध्ये किति विद्यार्थ्यांनी कोणता पेपर निवडावा यासंदर्भात नविन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये उल्लेख केला जावा.
7. नविन शैक्षणिक धोरण २०२० ची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणारे महाविद्यालय, तेथील प्रशिक्षित कर्मचारी आणि आवश्यक साधन साहित्याची जुळवणी करण्यावर भर देणारे असावे. या सर्वांची सांगड जेव्हा एकसोबत जोडली जाईल तेव्हाच सकारात्मक परिणाम झालेला दिसून येईल.
8. नविन शैक्षणिक धोरण २०२० मध्ये आचार्य पदवी करिता जी १२ क्रेडीट प्रणाली सुरु करण्यात आली आहे त्यात १२ पैकी कमीत कमी ६ क्रेडीट करिता संशोधन पध्दती संदर्भात स्वयंम पोर्टलवर एन. पी. टी. एल. द्वारे ज्यावेळी कोर्स उपलब्ध असेल त्यावेळी विद्यार्थ्यांना करता येईल, त्यामुळे आचार्य नोंदणी करणा-या विद्यार्थ्यांकडे पेट / सेट / नेट या परिक्षेचे प्रमाणपत्र असले तरी क्रेडीट कोर्स त्या त्या कालावधीत पुर्ण न झाल्याने आचार्य नोंदणीची प्रक्रिया लांबणीवर पडू शकते, त्यामुळे आतापर्यंत संशोधन उत्पादकतेमध्ये जी वाढ होत आलेली आहे त्यावर मार्यादा येण्याची शक्यता आहे.
9. ज्या संशोधकांनी आचार्य पदवी करिता अर्धवेळ (पार्टटाईम) कालावधी निवडून नोंदणी केलेली आहे अश्या संशोधकांना नो ऑब्जेक्शन सर्टीफ़िकेट दिले जात असून सुध्दा कार्यरत कार्यालयातून वारंवार सुट्ट्या मान्य केल्या जात नाही, संशोधकांना सुट्टी घ्यावी लागते त्यामुळे त्यांच्या सुट्ट्या कमी होतात किंवा कामावर गैरहजर असल्याचा शेरा लावला जातो, यावर काही उपाय सुचवावे.
10. नविन शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणीची चौकशी होत रहावी आणि त्याची नोंदणी होत राहावी.

**संदर्भसुची : (ए. पी. ए. शैली पुस्तीकानुसार)**


- बोधनकर, सुधिर, अलोणी विवेक आणि कुलकर्णी मृणाल (२०१४). सामाजीक संशोधन पध्दती. नागपूर, साईनाथ प्रकाशन
- Agashe, Ajay. (2008). A Study of Dr. P. S. G. Kumar's academic contribution in Library and Information Science. (PhD Thesis, RTMNU, Nagpur)

- Dharmik, Priti. (2017).“Research Impact measurement tools for researchers and publishers : An analytical study with special reference to Library and Information Science”. (PhD Thesis, RTMNU, Nagpur)
- Gupta, Vishnu Kumar. (२०२०). Accuracy of references in the doctoral theses in library and information science submitted to Banasthali Vidyapith. Annals of LIS, Vol 67, No 3 (2020), DOI: 10.56042/alis.v67i3.37856
- Lokhande, Rahul. (2014). Content analysis of Library and Information Science Open Access Journals (2005 - 2009). (PhD Thesis, RTMNU, Naagpur)
- Mandal, Netai. (2023). An evaluative study of Library & Information Science Research during 1987 – 2020 based on Authorship and Co – Citation analysis. ILA Journal, Vol. 59, No.1
- Moutusim Basak, Sanku Bilas Roy. (2022). Landscape of Library and Information Science Research in India : An analytical study. ILA Journal, Vol. 58, No.3
- https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf (accessed 25/12/2023)
- https://www.education.gov.in/nep/aboutep#:~:text=In%20school%20education%2C%20the%20National,solving%20%E2%80%93%20but%20also%2C%20social%20and (accessed 25/12/2023)
- nagpuruniversity.ac.in/ (access date 09/12/2023)
- https://nagpuruniversity.ac.in/writereaddata/fckimagefile/NEP%20MLISC%20SYLLABUS%20,2023_compressed.pdf (accessed 23/12/2023)
- Direction_no._34_2023_Award_of_Ph._D._Degree.pdf(accessed 22/12/2023)
- https://nagpur.university/phdportal/doclinks/NotiCirInfofrm(accessed 22/12/2023)
- https://www.nagpuruniversity.ac.in/links/Syllabus/Faculty_of_Social_Science/Syllabus.pdf (accessed 23/12/2023)
- https://www.nagpuruniversity.ac.in/links/Syllabus/Faculty_of_Social_Science/MLISC%20Direction.pdf (23/12/2023)
- https://www.nagpuruniversity.ac.in/links/Syllabus/Faculty_of_Social_Science/exam%20scheme.pdf (accessed 23/12/2023)
- https://www.nagpuruniversity.ac.in/links/Syllabus/Faculty_of_Social_Science/Instruction%20M.%20LISc%20Course.pdf (accessed 23/12/2023)